# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 12.10.2025** **वार- रविवार**

---

**पल्सपोलिओ**

पुणे जिल्ह्यात आज पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ औंधमध्ये जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. “या मोहिमेद्वारे एकही बालक पोलिओ लसीकरणापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता आरोग्य विभाग घेत आहे. जिल्ह्यातल्या 0 ते 5 वयोगटातील सर्व बालकांचं पल्स पोलिओ प्रतिबंधक लसीकरण करुन घ्यावं, असं आवाहन पाटील यांनी केलं. जिल्ह्याच्या ग्रामीण भागातल्या सुमारे 5 लाख 7 हजार तसंच शहरी भागातल्या सुमारे 70 हजार बालकांचं पोलिओ प्रतिबंधक लसीकरण करण्यात येत आहे. यासाठी सुमारे चार हजार बूथ उभारण्यात आले आहेत. या मोहिमेअंतर्गत वीटभट्टी, उसतोड कामगार, स्थलांतरित, बांधकाम कामगार आदींच्या 0 ते 5 वर्षे वयोगटातील बालकांना काल पोलिओचे डोस देण्यात आले.

**परवाने**

कफ सिरपच्या सेवनानं बालकांचा मृत्यू झाल्यावर अन्न आणि औषध प्रशासनानं राज्यभरात डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय कफ सिरपची विक्री करणाऱ्या औषध विक्रेत्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. पुण्यात 20 औषध विक्रेत्यांवर कारणे दाखवा नोटीस जारी करण्यात आली असल्याची माहिती पुणे विभागाचे सह आयुक्त गिरीश हुकरे यांनी दिली. पुणे जिल्हा औषध विक्रेत्या संघटनेनं केवळ औषध विक्रेत्यांवरच लक्ष केंद्रित न करता, बनावट औषधे तयार करणाऱ्या कंपन्या आणि ऑनलाइन औषधविक्री करणाऱ्या कंपन्यांवरही कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ‘एफडीए’कडे केली आहे.

**स्वच्छ भारत**

पिंपरी चिंचवड महापालिकेकडून स्वच्छ भारत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्या अंतर्गत आज महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीनं इंदिरानगर, मोरवाडी, म्हाडा कॉलनी, शिवनेरी सोसायटी, अजिंठानगर, सुमन मॉल तसंच किशोर पंप कंपनी परिसरात ‘वेस्ट टू वंडर’ हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमा अंतर्गत कचऱ्यातील टाकाऊ वस्तूंचा वापर करून परिसराचं सौंदर्यीकरण करण्यात आलं आहे. जुने पाईप, प्लास्टिकच्या बाटल्या, लाकूड, माठ, दगड आदी वस्तूंना कल्पकतेचा स्पर्श देत त्यातून आकर्षक कलाकृती तयार करण्यात आल्या आहेत.

विविध रंगसंगती, रेखीव सजावट आणि भिंतींवर कल्पकतेने रेखाटलेल्या चित्रांनी या परिसराचा कायापालट केला आहे.

**एमआयटी**

एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचा सातवा दीक्षांत समारंभ आज  संस्थेच्या लोणी काळभोर परिसरात पार पडला. पश्चिम बंगालचे राज्यपाल डॉ. सी.व्ही. आनंद बोस यांच्या हस्ते विद्यापीठाच्या सुमारे हजार 800 विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रं प्रदान करण्यात आली.

**मदत**

राजर्षि शाहू सहकारी बँकेच्या वतीनं पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे मुख्यमंत्री सहायता निधीसाठी 11 लाख रुपयाचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. पूरग्रस्तांना केलेल्या मदतीबद्दल पवार यांनी बँकेच्या संचालक मंडळाचे आभार मानले.

**जिल्हा परिषद मोफत श्रवणयंत्र**

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या पुढाकारातून जिल्हा परिषद शाळांमधील श्रवणदोष असलेल्या 400 विद्यार्थ्यांना श्रवणयंत्रं देण्यात आली. ‘ऑटोस इंडिया’ कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व म्हणजे सीएसआर निधीतून यासाठी एक कोटी रुपयांची मदत करण्यात आली.

**आयुष्यमानभारत-कार्ड**

भारतीय जनता पक्षाच्या वतीनं कोंढवा भागात आयुष्यमान भारत योजनेच्या कार्डचं वाटप करण्यात आलं. पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते अली दारूवाला यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. दोन दिवसात पाच हजार नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. आभा योजनेबरोबरच आधार कार्ड, पॅन कार्ड, रेशनकार्ड सह अन्य शासकीय योजनांसाठीही यावेळी मदत करण्यात आली.

**प्रदर्शन**

नवकार आर्ट फाऊंडेशनतर्फे राज्यातल्या 40 चित्रकारांनी रेखाटलेल्या 90 चित्रांचं प्रदर्शन बालगंधर्व कलादालनात सुरू आहे. नवोदित कलाकारांच्या कलेला प्रोत्साहन देण्यासाठी हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

**बाजार**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गुलटेकडी आवारात आज महाराष्ट्रासह इतर राज्यातून सुमारे ऐंशी ते नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. आवक काहीशी कमी झाल्यानं हिरवी मिरची, सिमला मिरची, फ्लॉवर, गाजर आणि मटार महागले आहे. मध्यंतरीच्या पावसामुळे पालेभाज्यांचं नुकसान झालं असून पालेभाज्यांचे भाव वाढले आहेत.

फळ बाजारात कलिंगडला मागणी वाढली असून भाव वाढले आहेत. दीपावली सणाला अद्याप आठवडाभराचा अवकाश असून फूल बाजारात फारशी उलाढाल नाही. फुलांची आवक घटली असली तरी मागणीही फारशी नसल्यानं बहुतांश फुलांचे दर टिकून आहेत.

**हवामान**

जिल्ह्यात हवामान कोरडं असून तापमानात काहीशी वाढ झाली आहे. आज कमाल तापमान 32 पूर्णांक 8 दशांश अंश तर किमान तापमान 19 पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये. नमस्कार.**